**प्रेसनोट दि. ०५.०८.२०२२**

लोकसेवक श्री सुर्यकांत मारूती नलवडे, वय ५२ वर्ष, कार्यकारी अभियंता, ताकारी म्हैशाळ उपसा सिंचन व्यवस्थापन विभाग, वारणाली सांगली रा.नानानानी पार्क, आरवाडे पार्क रेल्वे स्टेशनसमोर सांगली व राहुल शिवाजी कणेगावकर वय ३७ वर्ष व्यवसाय कन्स्ट्रक्शन रा. घर नं. ६७५ शाहुनगर विजयनगर ता. मिरज जि.सांगली यांना १,००,०००/-रूपये लाच स्विकारले नंतर रंगेहात पकडले सांगली लाच लुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.

---

तक्रारदार कंत्राटदार असून त्यांना कार्यकारी अभियंता ताकारी म्हैशाळ उपसा सिंचन व्यवस्थापन विभाग सांगली कार्यालयाकडून ऑनलाईन ई टेंडर व्दारे वारणाली वसाहत अंतर्गत सार्वजनिक स्वच्छता, उपहारगृह, दुरूस्ती करीता स्विपर, मजुर पुरवणे हे काम मिळाले आहे. सदर कामाचा कार्यारंभ आदेश देण्याकरीता श्री.नलवडे,कार्यकारी अभियंता यांनी तक्रारदार यांचेकडे १,००,०००/- रूपये लाचेची मागणी केली असल्याबाबतचा तक्रारी अर्ज दि.०१.०८.२०२२ रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो सांगली पथकास दिला होता.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार दिनांक ०५.०८.२०२२ रोजी ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे पडताळणी केली असता त्यामध्ये लोकसेवक श्री.नलवडे, कार्यकारी अभियंता यांनी तक्रारदार यांना कामाचा कार्यारंभ आदेश देण्यासाठी १,००,०००/- रूपये लाचेची मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर लागलीच ताकारी म्हैशाळ उपसा सिंचन व्यवस्थापन विभाग, वारणाली सांगली या ठिकणी लोकसेवक नलवडे यांचे विरूध्द सापळा कारवाई आयोजीत केली असता सापळा कारवाई वेळी लोकसेवक नलवडे यांनी तक्रारदार यांना लाचेची रक्कम राहुल कणेगावकर यांचेकडे देण्यास सांगीतली. त्याप्रमाणे लक्ष्मी देऊळा जवळील सह्याद्री कन्स्ट्रकशन या कार्यालयात सापळा कारवाई आयोजीत केली असता राहुल कणेगावकर यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करून १,००,०००/- रूपये तक्रारदार यांचेकडून स्विकारले नंतर त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.

त्या अनुषंगाने लोकसेवक श्री सुर्यकांत मारूती नलवडे, वय ५२ वर्ष, कार्यकारी अभियंता, ताकारी म्हैशाळ उपसा सिंचन व्यवस्थापन विभाग, वारणाली सांगली रा.नानानानी पार्क, आरवाडे पार्क रेल्वे स्टेशनसमोर सांगली व राहुल शिवाजी कणेगावकर वय ३७ वर्ष व्यवसाय कन्स्ट्रक्शन रा. घर नं. ६७५ शाहुनगर विजयनगर ता. मिरज जि.सांगली यांचे विरुध्द संजयनगर पोलीस स्टेशन येथे लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमाखाली गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

सदरची कारवाई मा. श्री. राजेश बनसोडे सो पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, श्री. सुरज गुरव सो, अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे यांचे मार्गदर्शनाखाली श्री. सुजय घाटगे, पोलीस उप अधीक्षक, श्री.विनायक भिलारे पोलीस निरीक्षक, पोलीस अंमलदार संजय कलगुटगी, सलीम मकानदार,भास्कर भोरे,रविंद्र धुमाळ, सिमा माने, अविनाश सागर, श्रीपती देशपांडे यांनी केली आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स ॲप नंबर ७८७५३३३३३३ व मोबाईल नंबर ८९७५६५१२६२ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

संपर्क :-

१) मोबाईल ॲप - www.acbmaharashtra.net

२) फेसबुक पेज - www.facebook.com-maharashtraACB

३) वेबसाईट – www.acbmaharashtra.gov.in

पोलीस उप अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सत्यमेव जयते

(सुजय घाटगे)
पोलीस उप अधीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो, सांगली.

Scanned with OKEN Scanner